# करिंथकरांप्रमाणे तुमच्या मंडळीलाही आध्यात्मिक कृपादाने मिळाली आहेत

मुलांना शिकवणायांनी S6b हा अभ्यास वाचावा.

**सर्व विश्वासणूयांनी त्यांना देवाकडून मिळालेल्या विशेष कृपादानाने एकमेकांची सेवा करावी.**



1. **तुमच्या मंडळीने त्यांच्या आध्यात्मिक कृपादांनासह सेवा करावी याकरीता त्यांना प्रेरणा देण्यासाठी प्रार्थना व देवाच्या वचनाच्याद्वारे स्वत:ची तयारी करा.**

सध्याच्या गरजा आणि स्थानिक रितीरिवाज लक्षात घेऊन कार्यक्रम निवडा.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू येशू आमच्या मंडळया व गटांमधील सर्व संदस्यांना तू तुझी व इतरांची सेवा आनंदाने करण्याचे सामर्थ्य दिले आहेस. ते शोधण्यासाठी कृपा करुन तू त्यांचे साहाय्य कर.''

**पाहा रोम 12:4-8 मध्ये :**

- विश्वासणूयांच्या आध्यात्मिक कृपादानांचा लाभ कोणाला झाला पाहिजे? *(वचन 5)*
- प्रत्येक विश्वासणूयाला कोणते कृपादान द्यायचे हे देव कसे ठरवतो. *(6)*
- संदेश देण्याच्या कृपादानांचे दोन प्रकार काय आहेत *(6 व 7)*
- सेवा करण्याचे तीन प्रकार कोणते आहेत *(7 व 8)*

**पाहा 1 करिंथ अध्याय 12 मध्ये** देवाचा पवित्र आत्मा एकमेकांची सेवा करण्यासाठी प्रत्येक विश्वासणूयाला कशा प्रकारे सामर्थ्य पुरवतो.

- आध्यात्मिक कृपादाने, सेवा करण्याची क्षमता आणि कार्ये कोण देतो? *(वचने 3-6)*
- कोणत्या विश्वासणूयांना आध्यात्मिक कृपादाने मिळतात? *(7 व 11)*
- कृपादाने देण्यामागे पवित्र आत्म्याचा काय उद्देश्य असतो? *(7)*
- विश्वासणूयाला कोणते कृपादान द्यायचे याची निवड कोण करते? *(11)*
- कोणत्या ख्रिस्ती लोकांना देवाचा पवित्र आत्मा मिळतो? *(12 व 13)*
- कोणती तीन आध्यात्मिक कृपादाने सर्व ख्रिस्ती लोकांकडे असली पाहिजेत? *(27-30)*

**पाहा 1 करिंथ 14:24-26 मध्ये :**

- प्रत्येक विश्वासणूयाला संभामध्ये इतरांची सेवा करता येईल असे मार्ग.

- आध्यात्मिक कृपादानाचां उपयोग करण्यामागे प्रत्येक विश्वासणूयाचा उद्देश काय असला पाहिजे.

**पाहा इफिस 4:10-16 मध्ये**

- आध्यात्मिक कृपादाने लाभलेले लोक मंडळयांना कोण देते. *(10-11)*
- मंडळयांना देऊ केलेल्या पाच प्रकारची कृपादाने लाभलेल्या व्यक्ती *(11)*
- कृपादान लाभलेल्या व्यक्तींनी त्यांच्या आध्यात्मिक कृपादानांचे काय केले पाहिजे *(12)*
- मंडळयांनी त्यांच्या आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग केल्या मुळे होणारे परिणाम. *(13-16)*

**पाहा 1 पेत्र 4:7-11 मध्ये**

- विश्वासणारे त्यांच्या आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग करतात तेव्हा त्यांचा एकमेकांविषयीचा दृष्टकोन काय असावा. *(7-9)*
- विश्वासणूयांनी त्यांच्या आध्यात्मिक कृपादानांचे काय केले पाहिजे *(10)*
- आध्यात्मिक कृपादानांचे दोन प्रमुख प्रकार *(11)*
- कृपादान मिळालेल्या सेवकांना त्यांची, कृपादाने उपयोगात आणण्यासाठी सामर्थ्य कोठून मिळते *(11)*
- आमच्या आध्यात्मिक कृपादानांनी आम्ही कोणाचे गौरव केले पाहिजे *(11)*

**बर्णबाने** त्याची पुढील कृपादाने उपयोगात आणली ते पाहा : दान देणे प्रे.कृ. 4:32-37, प्रोत्साहन देणे प्रे. 9:22-27, विश्वास प्रे.कृ. 11:22-66, शिक्षण देणे 13:1 मध्ये प्रेषितीय कार्य प्रे.कृ. 13:2-4.

## 2. पुढील आठवडयातील कार्यक्रम तुमच्या सहकाूयांशी चर्चा करुन ठरवा

आध्यात्मिक कृपादानांचा तपशील सविस्तर वर्णन यासाठी पौल-तिमथी पुस्तिका S6e ची एकत्रित उजळणी करा. ही पुस्तिका आणि मेंढपाळांच्या लहान गटाबरोबर तुम्ही करीत असलेला अभ्यास अशा दोन्ही गोष्टींची उजळणी करण्याची योजना आखा.

मंडळीतील प्रत्येक सदस्याच्या आध्यात्मिक कृपादाना विषयी, तुम्हांला ठाऊक असेल तर, एकत्रित चर्चा करा.

प्रत्येक लहान गटाच्या मेंढपाळाने गटातील सदस्यांचे ऐकावे, पाहावे आणि प्रत्येकाचे आध्यात्मिक कृपादान काय आहे ते जाणून घेण्यासाठी व्यवस्था करा.

समजा एखाद्या गटाला कृपादानाची आवश्यकता असेल आणि दुसूया गटातील लोकांकडे ते असेल तर मग थोडया काळासाठी त्या व्यक्तीला ह्या गटात आणण्याची व्यवस्था करा.

## 3. येणाूया उपासनासभेविषयी तुमच्या सहकाूयांशी चर्चा करुन योजना आखा.

बर्णबाने त्याला लाभलेल्या आध्यात्मिक कृपादानांचा कसा उपयोग केला ते सांगा किंवा नाट्यीकरण करा आणि त्यांनी नाव का बदलले यावर चर्चा करा (प्रे.कृ. 4:36).

विश्वासणूयांला मिळणारी आध्यात्मिक कृपादाने आणि इतर मार्गदर्शन तत्वे (पाहा भाग 1) आम्ही कोणत्या उद्देशाने वापरायची हे देवानेच निश्चित केलेले असते याचे स्पष्टीकरण करा. भाग 1 मधून आध्यात्मिक कृपादानांविषयी प्रश्न विचारा.

आपली आध्यात्मिक कृपादाने सूज्ञपणे प्रीतीने उपयोगात आणणूयांकडून साहाय्य मिळालेल्या विश्वासणूयांना त्यांच्या साक्षी देण्यास सांगा.

**1. करिंथ 14:24-31** एकत्रितपणे वाचा आणि विश्वासणूयांना त्यात नमूद केलेल्या काही आध्यात्मिक कृपादानांची नावे सांगायला सांगा. यापैकी कोणऽया कृपादानांचा उपयोग प्रत्यक्षात केलेला त्यांनी मंडळीत किंवा प्रार्थना गटात पाहिला असल्यास त्याबद्दल सांगण्यास सांगा.

मुलांना त्यांनी तयार केलेली नाटिका सादर करण्यास आणि प्रश्न विचारण्याची संधी द्या.

**प्रभुभोजनाची ओळख** करुन देण्यासाठी 1 करिंथ 11:23-34 वाचा. करिंथकरांनी प्रभुभोजनाचा कसा दुरुपयोग केला आणि त्यापैकी काहींना देवाने आजारपण व मरण का दिले याचे स्पष्टीकरण करा.

विश्वासणायांचे दोन-तीन जणांचे लहान गट करुन त्यांना आपआपल्या आध्यात्मिक कृपादानांविषयी बोलण्यास सांगा. एकमेकांचे ऐकून प्रोत्साहन द्या आणि एकमेकांसाठी प्रार्थना करा.

**पाठ करा** रोम 12:10-11.

## आध्यात्मिक कृपादाने वापरण्यासाठीची मार्गदर्शक तत्वे

1. लोक लहान लहान गटांमध्ये एकमेकांची सेवा करतील तेव्हा त्यांची आध्यात्मिक कृपादाने स्पष्टपणे दिसतील आणि इतरांनाही ती ओळखता येतील. नवीन विश्वासणायांना सेवा करण्यापासून दूर ठेवू नका.
2. सर्वविश्वासणायांना त्यांची त्यांची आध्यात्मिक कृपादाने उपयोगात आणता यावीत यासाठी संधी उपलब्ध करुन द्या. लहान गटांत हे काम चांगल्या प्रकारे करता येईल. बुद्धिकौशल्य असणाया लोकांचे फक्त ऐकणे एवढयाच पुरती उपासनेची सभा मर्यादित असू नये.
3. विश्वासणायांनी त्यांच्या आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग लोकांसाठी प्रेमाने करावा याची त्यांना सतत आठवण करुने द्या. लोक चिडणारे किंवा प्रेम न करणारे असतील त्यांची कृपादाने लोकांना दुखावणारी ठरण्याची शक्यता असते.
4. लोकांना त्यांच्या त्यांच्या आध्यात्मिक कृपादानांनुसार मंडळयां मध्ये व गटांत जबाबदाया, पदे आणि सेवा सोपवून द्या. लोकांना जे कृपादान नसेल ते काम त्यांना देऊ नका.
5. वडीलजनांना संदेश देण्याचे कृपादान आणि सेवकांना सेवा करण्याचे कृपादान असणे अगत्याचे आहे.
6. लहान गट आणि सेवेचे चमू यातील सदस्यांना निरनिराळी कृपादाने लाभलेली असावीत. पवित्र आत्मा ह्या कृपादानांचा योग्य ताळमेळ घालतो. एकाच प्रकारचे कृपादान असलेल्या व्यक्तींना एका गटात ठेवू नका.
7. आध्यात्मिक कृपादान लाभले म्हणजे इतर विश्वासणायांवर अधिकार मिळाला असे नाही. त्याऐवजी, इतरांना लाभ होईल अशा पद्धतीने शरीररूपी ख्रिस्ताची सेवा करण्यासाठी आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग केला पाहिजे.
8. प्रत्येक विश्वासणायाला आध्यात्मिक कृपादान मिळालेले आहे, त्याचा इतरांना लाभ होतो. त्यामुळे प्रत्येक विश्वासणारा हा इतरांसाठी महत्वाचा असतो. यामध्ये त्यांचा वंश, शैक्षणिक पात्रता, ज्ञात किंवा सामाजिक स्थान या गोष्टींचा संबंध येत नाही.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net